जामनेर नगरपरिषद, जि.जळगांव
यांच्या आस्थापनेवर मंजूर केलेल्या
आकृतीबंधातील मंजूर पदांचा आढावा
प्रस्तावित सुधारीत आकृतीबंध

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई-४०० ०३०.

या संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं २००५/३/९ जेए/१३/प्रलंबित पदनि/प्र.क्र.१२८/२००५/का-१०
दिनांक : / /२००४ 15 JUL 2005

वाचा : १) शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१
२) या कार्यालयाचे पत्र क्र.नप्रसंई २००१/प्र.क्र.१८१/२००१/७, दि.२८.३.२००२
३) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.जीईएन १०२०००/१६५३/प्र.क्र.१२८/२०००/नवि-१६, दि.२८.१०.२००२
४) नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.९९ दिनांक १५.७.२००४
५) मुख्याधिकारी, नगरपरिषद जामनेर यांचे पत्र क्र.नपजा/११०४/०४ , दि.२९.१०.२००४
६)या संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं २००५/३/९ जेए/१३/प्रलंबित पदनि/प्र.क्र.१२८/२००५/का-१०, दि.१५.३.२००५

## आ दे श

जामनेर नगरपरिषद उपरोक्त वाचा क्र.३ येथे नमूद केलेल्या शासनाच्या दिनांक २८.१०.२००२ च्या आदेशान्वये घोषित केलेली आहे. नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.९९ दिनांक १५.७.२००४ अन्वये नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पदांबाबत पदनिर्मितीचा निर्णय घेण्यांत आला आहे. जामनेर नगरपरिषद घोषित झाल्यानंतर नगरपरिषदेच्या आस्थापनेवर प्रथमच नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव उपरोक्त वाचा क्र.५ येथे नमूद केलेल्या दिनांक २९.१०.२००४ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

त्यास अनुसरुन मुख्याधिकारी नगरपरिषद जामनेर यांच्याशी पदांच्या आढाव्याबाबत बैठक झाली. उपरोक्त वाचा क्र.६ येथील या संचालनालयाचे दि.१५.३.२००५ चे आदेश निष्काषित करण्यात येऊन सोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे मंजूर पदांच्या प्रस्तावित सुधारीत आकृतिबंधास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६(१) व (२) नुसार खालील अटींवर मान्यता देत आहे.



नगरपरिषद जामनेर
जि. जळगांव
आवक क्र. 2709
दिनांक 25/7/05
विभाग आव्या
नगराध्यक्ष
मुख्याधिकारी
कार्यालयीन अधिक्षक

अटी :

१) परिशिष्ट अ येथील अस्थायी पद, त्या पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास किंवा अन्य कारणाने अस्थायी पद रिक्त झाल्यास अस्थायी पद निष्कासित होईल. याशिवाय स्थायी पद रिक्त झाल्यास अस्थायी पदावरील कर्मचाऱ्यास जेष्ठतेनुसार स्थायी पदावर वर्ग करण्यात यावे. व त्यानंतर अस्थायी पद निष्कासित होईल.

२) नगरपरिषद आस्थापनेवरील पदांचा संवर्गनिहाय गोषवारा परिशिष्ट ब येथे नमूद करण्यात आला आहे.

३) नगरपरिषदा आस्थापनेवर मंजूर पदांसाठी वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता व भरतीची कार्यपध्दत परिशिष्ट क येथे विहीत करण्यात आली आहे. ही शैक्षणिक अर्हता व भरतीची कार्यपध्दत नव्याने करण्यात येणाऱ्या सरळसेवेने नियुक्तीसाठी व पदोन्नतीसाठी लागू राहील.

४) शासनाने नगरपरिषद कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परिक्षा विहीत केल्यानंतर ती उत्तीर्ण होणे बंधनकारक असेल.

५) नगरपरिषद आस्थापना खर्चाच्या टक्केवारीबाबत, पदभरतीमधील वयोमर्यादेबाबत व पदांच्या आरक्षणाबाबत शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेले आदेश लागू राहतील. सध्या याबाबत खाली नमूद केलेले अ ते फ मधील आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**अ)** नगरपरिषद आस्थापनेवरील खर्चाची टक्केवारी शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि २७, दि.२८ सप्टेंबर २००० अन्वये विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता नगरपरिषदेने घ्यावी.

(ब) उमेदवाराची नगरपरिषद आस्थापनेवरील पदभरतीमध्ये वयोमर्यादा ही १८ ते ३० वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्षे शिथील अशी राहील.

(क) नगरपरिषद आस्थापनेवरील एकूण पदांचे आरक्षण हे परिशिष्ट ब येथे नमूद केल्यानुसार संवर्गनिहाय स्थायी पदांवर आरक्षण राहील. नगरपरिषद आस्थापनेवरील मागासवर्गीयांच अनुशेष प्रथम भरुन काढण्यात यावा.

(ड) सरळ भरतीकरीता शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी/१०९७/प्र.क्र.२/ १६ ब, दि.२९.३.१९९७ नुसार विहीत केलेली १०० बिंदू नामावली वापरावी. पदोन्ननतीसाठी शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि.१८.१०.१९९७ नुसार विहीत केलेली १०० बिंदू नामावली वापरावी.

(इ) शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६ अ, दि.१६.३.१९९९ नुसार नगरपरिषद आस्थापनेवरील सरळ सेवेवरील नियुक्त्यांसाठी विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) माजी सैनिक १५ टक्के, प्रकल्पग्रस्त /भूकंपग्रस्त ५ टक्के, अपंग ३ टक्के आणि महिलांसाठी ३० टक्के असे राहील.)

(फ) शासन महिला व बालविकास निर्णय क्र.८२/२००१/मसेआ/२०००, दि.२५.५.२००१ मधील परि-१ अनु.क्र.७ व ८ नुसार भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाला नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरष उमेदवारामार्फत भरण्यात यावे. महिलांच्या आरक्षणाचा अनुशेष पुढे ओढण्यात येऊ नये. या अटींचे पालन करण्यात यावे.

६) ज्या पदांचा राज्यस्तरीय संवर्ग निमार्ण करण्यात येत आहे. (१.अभियांत्रिकी सेवा, (स्थापत्य, विद्युत, संगणक) निवडश्रेणी नगरपरिषद अभियंता/नगरपरिषद अभियंता-श्रेणी-अ,ब, (क-प्रथम,द्वितीय)/ बांधकाम पर्यवेक्षक/ कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक, २.लेखा विभागातील निवडश्रेणी लेखापरीक्षक/लेखाअधिकारी/ लेखापरीक्षक/ लेखाअधिकारी (गट-अ,ब) (क-प्रथम, द्वितीय)/लेखापाल/लेखापरिक्षक/ सहाय्यक लेखापाल/ सहाय्यक लेखापरिक्षक, ३.नगररचना विभागातील निवडश्रेणी नगरपरिषद नगररचनाकार/नगपरिषद नगररचनाकार (गट-अ,ब) (क-प्रथम, द्वितीय)/ रचना सहायक/ कनिष्ठ रचना सहायक, ४. अग्निशमन विभागातील निवडश्रेणी अग्निशमन अधिकारी/अग्निशमन अधिकारी (गट-अ,ब) (क-प्रथम द्वितीय)/अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक/ सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक, ५.पाणी पुरवठा विभागातील पाणीपुरवठा, जलनि:सारण व स्वच्छता अभियंता (गट-अ,ब) (क-प्रथम, द्वितीय)/ पाणीपुवठा, जलनिसारण व स्वच्छता पर्यवेक्षक/ कनिष्ठ पाणीपुवठा, जलनिसारण व स्वच्छता पर्यवेक्षक, ६. कर व प्रशासकीय सेवा विभागातील (गट-अ-उपमुख्याधिकारी/करनिर्धारक व समाहरक अधिकारी/प्रशासकीय अधिकारी) (गट ब-उपमुख्याधिकारी ब वर्ग नगरपरिषद/प्रशासकीय व कामगार अधिकारी/कर अधिकारी/ / समाजकल्याण , माहिती व जनसंपर्क अधिकारी अधिकारी) (गट क प्रथम-कार्यालय पर्यवेक्षक/ कर निरिक्षक) (गट क द्वितीय- सहाय्यक समाजकल्याण ,माहिती व जनसंपर्क पर्यवेक्षक /सहाय्यक कर निरीक्षक/ सहाय्यक कार्यालय निरीक्षक), इ. पदे) अशी पदे नगरपरिषदेत भरण्यापूर्वी या संचालनालयाचे आदेश क्र.नपप्रस/कक्ष-१/संवर्ग/२००४,दि.८.११.२००४ अन्वये विचारणा करावी.

७) नगरपरिषदेमध्ये पदोन्नतीसाठी शैक्षणिक व अनुभवाच्या अटी पूर्ण करत असलेला कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यास, त्या पदाचा दर्जा/श्रेणी तात्पुरत्या स्वरुपात त्याच संवर्गामध्ये एक श्रेणीने (Grade) अवनत/कमी (Downgrade) करता येईल. अवनत केलेले पद नवीन भरतीने भरत असता शैक्षणिक पात्रता अनुभवाच्या अटीव्यतिरिक्त पूर्ण असणे आवश्यक आहे. अनुभवाची अट पूर्ण झाल्यानंतर हे पद उन्नत होईल. नवीन भरतीचे पद नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने स्थायी निदेश क्र.२०: क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.१५०/०३/७, दि.३१.१२.२००३ अन्वये नियुक्त केलेल्या पदोन्नती समितीच्या शिफारशींनुसार पद फक्त त्याच संवर्गामध्ये अवनत (Downgrade) करता येईल. एका संवर्गातील पद दुसऱ्या संवर्गामध्ये अवनत करता येणार नाही. तसेच वर्ग ३ चे पद वर्ग ४ मध्ये अवनत करता येणार नाही. अवनत केलेले पद नगरपरिषद आस्थापनेवर उपलब्ध असलेल्या कर्मचारी वर्गातून व शक्य नसल्यास नवीन भरतीने भरता येईल. पद अवनत (Downgrade) केल्यानंतर त्या पदावरील कार्यरत कर्मचाऱ्याची वेतनश्रेणी अवनत (Downgrade) पदाप्रमाणे असेल. पदोन्नतीसाठी शैक्षणिक व इतर अटी पूर्ण असलेला कर्मचारी वर्ग उपलब्ध झाल्यानंतर त्या पदाचा दर्जा /श्रेणी वाढवता/उन्नत (Upgrade) करता येईल.

८) नगरपरिषदेवर अस्थायी / अतिरिक्त ठरणारा कर्मचारी वर्ग नगरपरिषद स्वत:च्या आवश्यकतेनुसार इतर विभागात कार्यरत ठेवण्यासाठी सक्षम असेल.

९) नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील आढाव्याअंती सुधारीत आकृतीबंधामध्ये उच्च वेतनश्रेणीत कोणत्याही संवर्गातील पद उन्नत करण्यात आले असल्यास मूळ पदावरील कार्यरत कर्मचाऱ्याला आपोआप उन्नत पदाची उच्च वेतनश्रेणी लागू करता येणार नाही. जोपर्यंत उन्नत पदावर पदोन्नतीद्वारे कर्मचाऱ्याची नियुक्ती होत नाही तोपर्यंत सदर पद मूळच्या वेतनश्रेणीमध्येच तात्पुरत्या स्वरुपात अवनत करुन त्यावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यास वेतन अदा करण्यात यावे. या संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशान्वये (संदर्भ स्थायी निदेश क्र.२०, क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.१५०/०३/७, दि.३१.१२.२००३) नगरपरिषदेने पदोन्नतीबाबत कारवाई केल्यानंतर पदोन्नतीमध्ये पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यास उन्नत पदाची वेतनश्रेणी लागू होईल.

१०) नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील रिक्त होणारी स्थायी पदे खाली नमूद केलेल्या प्राधान्य क्रमानुसार भरता येतील. ही पध्दत या संचालनालयाचे स्थायी निदेश २३ क्र.नप्रसं/स्थायी निदेश/२००४/ प्र.क्र.२५०/४, दि.१९.१०.२००४ मध्ये देण्यात आलेली आहे.

**अ) अंतर्गत भरती**

१. अस्थायी पदांवरील कर्मचाऱ्यांना समांतर स्थायी पदावर वर्ग करणे
२. पदोन्नतीने
३. कर्मचाऱ्यांमधून अंतर्गत भरती.

**ब) नवीन भरती.**

नगरपरिषदेच्या आस्थापनेवर रिक्त पदे अंतर्गत भरतीने भरता येत नाहीत हे स्पष्ट झाल्यानंतर फक्त अशा परिस्थितीत जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे नवीन भरती करुन नगरपरिषदेस भरता येईल.

१. शासनाच्या अतिरिक्त कक्षातून

२. विशेष प्रकरणे-लाड कमिटीच्या शिफारशीनुसार आणि अनुकंपा तत्वाखालील नियुक्ती (जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने)

३. सरळसेवेने.- शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार (वर्ग ३ ची रिक्त पदे) सध्या जिल्हा निवड समितीमार्फत शिफारस केलेल्या पात्र उमेदवारांमधून भरावयाची आहेत व वर्ग ४ ची रिक्त पदे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, यांच्याकडून शिफारस केलेल्या पात्र उमेदवारांमधून नगरपरिषदेने निवड करुन भरावयाची आहेत.)

११) नगरपरिषदेस हंगामी/रोजंदारीवरील पदे निर्माण करता येणार नाहीत. आवश्यकता वाटल्यास कंत्राट पध्दतीने कामे करुन घ्यावीत, परंतु कोणत्याही परिस्थितीत कंत्राटी पध्दतीने पदे नेमता येणार नाहीत. अशी कामे कंत्राट पध्दतीने करुन घेताना सेवा/कार्यपूर्ततेचे कंत्राट देण्यात यावे. परंतु, मजूर पुरविण्याचे कंत्राट देता येणार नाही. तसेच वरीलप्रमाणे दिलेल्या कंत्राटाचे देयक हे झालेल्या कामाच्या परिमाणानुसार (Output Basis) वर आधारित असणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांना नगरपरिषदेच्या आस्थापनेवर इतर कोणतेही पद तात्पुरते/हंगामी /अंशकालीन मंजूर करता येणार नाही.

१२) शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीव्यतिरिक्त तसेच उपरोक्त नमूद केलेल्या कार्यपध्दतीव्यतिरिक्त अन्य नियमबाह्य रितीने व अपात्र असलेला कर्मचारी नियुक्त केल्यास तसेच रोजंदारी/हंगामी/खाडाबदली/कंत्राटी मानधनावर कर्मचारी नियुक्त केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्यावर राहील व अशा प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन बेकायदेशीर नियुक्तीच्या वेतनावर झालेला खर्च मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील तरतुदीनुसार या कार्यालयाचे पत्र क्र.नप्रसंई १००३ प्र.क्र.३६८/०३/५. दि.३.१.२००४ व स्थायी निदेश क्र.२१ क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.३६५/०३/५, दि.१२.१.२००४ नुसार भार व अधिभार निश्चित होऊन वसूल केला जाईल.

१३) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम १२३ मधील तरतुदीनुसार नमुना ९२ मध्ये विहीत नमुन्यातील लेख्यात परिपूर्ण नोंदी घेऊन तशा नोंदी घेतल्याचा मुख्याधिकारी यांनी लेखी दाखला १५ दिवसांत या संचालनालयास सादर करावा.

१४) नगरपरिषद आस्थापनेवरील सुधारीत मंजूर पदांचा आकृतीबंध ५ वर्षेपर्यंत वैध राहील. आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षांनंतर पुन्हा पदांचा आकृतीबंध या संचालनालयाकडून मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांना नगरपरिषदेच्या आस्थापनेवर इतर कोणतेही पद तात्पुरते/हंगामी/अंशकालीन मंजूर करता येणार नाही.

१५) नगरपरिषद आस्थापनेवर मंजूर करण्यात आलेली आवश्यक सर्व नवीन पदे सर्वसाधारण सभेकडून मान्यता घेतल्यानंतरच भरण्यात यावीत.

१६) या आकृतीबंधान्वये मंजूर करण्यात आलेल्या एकूण १३६ पदांपैकी ७१ स्थायी पदांनाच महागाई भत्ता अनुदान अनुज्ञेय असेल.

१७) आदेशाच्या दिनांकापासून हे आदेश लागू राहतील.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) मुख्याधिकारी, जामनेर नगरपरिषद, जि.जळगांव
२) जिल्हाधिकारी, जळगांव
३) प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन नाशिक विभाग, नाशिक
४) उपमुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, जळगांव.
५) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६) निवडक नस्ती.

जामनेर नगरपरिषद, जिल्हा जळगांव या आस्थापनेवर मंजूर पदांचा प्रस्तावित सुधारीत आकृतीबंध
या संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं २००५/३/९ जेए/१३/प्रलंबित पदनि/प्र.क्र.१२८/०५, दिनांक: 15 JUL 2005

परिशिष्ट अ

सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या : ३६०९८

| अ. क्र. | सांकेतांक क्रमांक | पदनाम | गट क्रमांक | आस्थापनेवरील स्थायी मंजूर पदे | | आस्थापनेवरील सेवानिवृत्त अथवा इतर कारणाने रिक्त पद झाल्यास निष्कासीत होणारी अस्थाई मंजूर पदे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ग ३ | वर्ग ४ | वर्ग ३ | वर्ग ४ |
| | | **सभा कामकाज व पदाधिकारी कार्यालय** | | | | | |
| १ | G-५ | लिपिक-टंकलेखक (सभा) | क | १ | ० | ० | ० |
| २ | G-८ | शिपाई (अध्यक्ष) | ड | ० | १ | ० | १ |
| ३ | G-६ | वाहनचालक | क | १ | ० | ० | ० |
| | | **मुख्याधिकारी कार्यालय (आस्थापना)/अभिलेखा कक्ष** | | | | | |
| १ | G-३(II) | सहायक कार्यालयीन निरीक्षक/अधिक्षक, २ | क | १ | ० | ० | ० |
| २ | G-५ | लिपिक-टंकलेखक | क | | | | |
| | | १. कार्यालयीन कामकाज | | २ | ० | ० | ० |
| | | २. आवक जावक | | १ | ० | ० | ० |
| ३ | G-८ | शिपाई | ड | ० | १ | ० | ० |
| ४ | G-६ | वाहनचालक | क | १ | ० | ० | ० |
| ५ | | रखवालदार | ड | ० | ० | ० | २ |
| | | **संगणक विभाग** | | | | | |
| १ | COM-३(II) | JUNIOR PROGRAMMER/ FACILITY MANAGER | क | १ | ० | ० | ० |
| | | **जन्म मृत्यू नोंदणी/तक्रार/परवाने दाखले विभाग** | | | | | |
| १ | G-५ | लिपिक-टंकलेखक (जन्म मृत्यू/तक्रार/CFC) | क | १ | ० | ० | ० |
| २ | G-८ | शिपाई | ड | ० | १ | ० | ० |
| | | **अतिक्रमण मिळकत व बाजार/भांडार खरेदी कक्ष** | | | | | |
| १ | G-५ | लिपिक-टंकलेखक(मिळकत) | क | १ | ० | ० | ० |
| | | **लेखा व अंदाजपत्रक विभाग** | | | | | |
| १ | ACT-३(II) | सहायक लेखापाल | क | १ | ० | ० | ० |
| २ | G-५ | लिपिक -टंकलेखक (रोखपाल) | क | १ | ० | ० | ० |
| ३ | G-८ | शिपाई | ड | ० | १ | ० | ० |

JAM-११

| अ. क्र. | सांकेतांक क्रमांक | पदनाम | गट क्रमांक | आस्थापनेवरील स्थायी मंजूर पदे | | आस्थापनेवरील सेवानिवृत्त अथवा इतर कारणाने रिक्त पद झाल्यास निष्कासीत होणारी अस्थाई मंजूर पदे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ग ३ | वर्ग ४ | वर्ग ३ | वर्ग ४ |
| **लेखापरीक्षण विभाग** | | | | | | | |
| १ | ACT-३(II) | सहायक लेखा परिक्षक | क | १ | ० | ० | ० |
| **कर विभाग** | | | | | | | |
| १ | G-३(II) | सहायक कर निरिक्षक | क | १ | ० | ० | ० |
| २ | G-५ | लिपिक-टंकलेखक | क | ५ | ० | ० | ० |
| ३ | G-८ | शिपाई | ड | ० | २ | ० | ० |
| **शहर सफाई विभाग** | | | | | | | |
| १ | SAN-४ | स्वच्छता निरिक्षक | क | १ | ० | ० | ० |
| २ | SAN-५ | मुकादम | ड | ० | २ | ० | १ |
| ३ | SAN-६ | सफाई कामगार | ड | ० | ३३ | ० | ० |
| **बांधकाम विभाग** | | | | | | | |
| १ | PW-३(II) | कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक | क | १ | ० | ० | ० |
| ३ | G-५ | लिपिक-टंकलेखक | क | १ | ० | २ | ० |
| ४ | G-८ | शिपाई | ड | ० | १ | ० | ० |
| ५ | | मजूर | ड | ० | ० | ० | ८ |
| **पाणी पुरवठा विभाग** | | | | | | | |
| १ | WW-३(II) | कनिष्ठ पाणी पुरवठा, जलनिःसारण व स्वच्छता पर्यवेक्षक | क | १ | ० | ० | ० |
| २ | WW-६ | पंप ऑपरेटर /वीजतंत्री/ जोडारी | क | १ | ० | ३ | ० |
| ३ | WW-५ | गाळणी चालक /प्रयोगशाळा सहाय्यक | क | १ | ० | ० | ० |
| ४ | WW-७ | व्हॉलमन | ड | ० | १ | ० | ५ |
| ५ | G-५ | लिपिकटंकलेखक | क | ० | ० | २ | ० |
| ६ | | रखवालदार | ड | ० | ० | ० | १ |
| ७ | | वाहनचालक | क | ० | ० | २ | ० |
| ८ | | वायरमन | क | ० | ० | ४ | ० |
| ९ | | मजूर | ड | ० | ० | ० | ११ |
| **दिवाबत्ती विभाग** | | | | | | | |
| १ | ELC-३(II) | कनिष्ठ विद्युत पर्यवेक्षक | क | १ | ० | ० | ० |

| अ. क्र. | सांकेतांक क्रमांक | पदनाम | गट क्रमांक | आस्थापनेवरील स्थायी मंजूर पदे | | आस्थापनेवरील सेवानिवृत्त अथवा इतर कारणाने रिक्त पद झाल्यास निष्कासीत होणारी अस्थाई मंजूर पदे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ग ३ | वर्ग ४ | वर्ग ३ | वर्ग ४ |
| २ | ELC-५ | तारतंत्री/इलेक्ट्रीशियन | क | १ | ० | ० | ० |
| ३ | G-५ | लिपिक टंकलेखक | क | ० | ० | २ | ० |
| ४ | | मुकादम | ड | ० | ० | ० | १ |
| ५ | | मजूर | ड | ० | ० | ० | ५ |
| **नगररचना विभाग (बांधकाम परवाना/ शहर व आर्थिक विकास विभाग)** | | | | | | | |
| १ | TP-३(II) | कनिष्ठ रचना सहाय्यक | क | १ | ० | ० | ० |
| **जकात विभाग** | | | | | | | |
| १ | G-५ | जकात लिपिक | क | ० | ० | १३ | ० |
| **इतर विभाग** | | | | | | | |
| १ | G-५ | लिपिक टंकलेखक | क | ० | ० | २ | ० |
| | | | | २८ | ४३ | ३० | ३५ |

(सुनिल सोनी)

आयुक्त तथा संचालक

नगरपरिषद प्रशासन संचालनालय

जामनेर नगरपरिषद, जिल्हा जळगांव

आस्थापनेवर मंजूर पदांचा प्रस्तावित सुधारी त आकृतीबंध

या संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं २००५/३/९ जेए/१३/प्रलंबित पदनि/प्र.क्र.१२८/०५, दिनांक: 15 JUL 2005

परिशिष्ट ब

नगरपरिषद आस्थापनेवरील मंजूर पदांचा संवर्ग

| अ. क्र. | संवर्ग व क्रमांक | संवर्गनिहाय पदनाम | मंजूर पदे स्थायी | अस्थायी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ अ | ४ ब |
| | | **वर्ग-३** | | |
| १ | G-३(II) | सहा.कार्यालयीन निरीक्षक/अधिक्षक/सहायक कर निरीक्षक | २ | ० |
| २ | G-४ | वरिष्ठ लिपिक* | ३ | ० |
| ३ | G-५ | लिपिक-टंकलेखक | १० | २१ |
| ४ | G-६ | वाहनचालक | २ | २ |
| ५ | COM-३(II) | JUNIOR PROGRAMMER/FACILITY MANAGER | १ | ० |
| ६ | ACT-३(II) | सहायक लेखापाल/सहायक लेखा परिक्षक | २ | ० |
| ७ | SAN-४ | स्वच्छता निरिक्षक | १ | ० |
| ८ | PW-३(II) | कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक | १ | ० |
| ९ | WW-३(II) | कनिष्ठ पाणी पुरवठा, जलनि:सारण व स्वच्छता पर्यवेक्षक | १ | ० |
| १० | WW-५ | गाळणी चालक /प्रयोगशाळा सहाय्यक | १ | ० |
| ११ | WW-६ | पंप ऑपरेटर /वीजतंत्री/ जोडारी | १ | ३ |
| १२ | ELC-३(II) | कनिष्ठ विद्युत पर्यवेक्षक | १ | ० |
| १३ | ELC-५ | तारतंत्री/इलेक्ट्रीशियन | १ | ० |
| १४ | TP-३(II) | कनिष्ठ रचना सहाय्यक | १ | ० |
| १५ | | वायरमन | ० | ४ |
| | | **वर्ग-४** | | |
| १ | G-८ | शिपाई | ७ | १ |
| २ | SAN-५ | मुकादम | २ | १ |
| ३ | SAN-६ | सफाई कामगार | ३३ | ० |
| ४ | WW-७ | व्हॉलमन | १ | ५ |
| ५ | | मुकादम/मजूर/रखवालदार | ० | २८ |
| | | | ७१ | ६५ |

* G-४ वरिष्ठ लिपिकांची एकूण ३ स्थायी पदे G-५ लिपिक टंकलेखक पदांच्या संवर्गातून पदोन्नतीने कोणत्या विभागात कार्यरत ठेवावयाची याबाबत नगरपरिषद योग्य तो निर्णय घेईल.

(सुनील सोनी)

आयुक्त तथा संचालक

नगरपरिषद प्रशासन संचालनालय

जामनेर नगरपरिषद, जि.जळगांव यांच्या आस्थापनेवर मंजूर पदांचा प्रस्तावित सुधारीत आकृतीबंध

या संचालनालयाचे आदेश क्र. नपप्रसं २००५/३/९ जेए/१३/प्रलंबित पर्दान/प्र.क्र.१२८/२००५/का-२०, दिनांक

परिशिष्ट -क

संवर्गनिहाय पदांची किमान शैक्षणिक अर्हता व भरती पध्दत

15 JUL 2005

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पध्दत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळ सेवे साठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | G-३ (II) | नगरपरिषद कर व प्रशासकीय अधिकारी श्रेणी-क (द्वितीय) | सहायक खरेदी पर्यवेक्षक/ सहायक समाजकल्याण माहिती व जनसंपर्क पर्यवेक्षक/ सहायक कर निरीक्षक / सहायक कार्यालय निरीक्षक/ सहायक मिळकत व्यवस्थापक /सहाय्यक विधी व कामगार पर्यवेक्षक | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि सामाजिक सेवा/ लोक प्रशासन/ टाऊन अँड कंट्री प्लॅनिंग/ राज्यशास्त्र/ विधी/व्यवसाय व्यवस्थापन शास्त्र/अभियांत्रिकी शाखा विषयातील पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक.<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. न.प. सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील LGS उत्तीर्ण प्रमाणपत्र असणे आवश्यक. | कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. लिपिक /वरिष्ठ लिपिक संवर्गातील पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता (सरळसेवेसाठी विहीत केलेल्या विषयातील)धारण केली असल्यास किमान तीन वर्षांचा, पदवीधारकास किमान सात वर्षांचा, पदविकाधारकास किंवा उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण असल्यास किमान बारा वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.<br>या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील LGS उत्तीर्ण प्रमाणपत्र असणे आवश्यक. | ५०% | ५०% |

टीप : G-३ (II) या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करुन G-३(I) कार्यालय पर्यवेक्षक/कर निरीक्षक (५०००-८०००)म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पध्दत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| २ | G-४ | वरिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | क ४०००-६००० | लागू नाही. | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व टंकलेखनाचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र. (महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले.) असणे आवश्यक.<br>३० श.प्र.मि. मराठी<br>४० श.प्र.मि.इंग्रजी<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>लिपिक टंकलेखक पदावरील किमान **बारा वर्षाचा अनुभव** असणे आवश्यक.<br>या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय प़रीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र आवश्यक. | लागू नाही. | १००% |

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ३ | G-५ | लिपिक-टंकलेखक | लिपिक-टंकलेखक व डेटा एन्ट्री ऑपरेटर/ रोखपाल/ टेलिफोन ऑपरेटर | क ३०५०-४५९० | किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. पदवीधारकांना प्राधान्य.<br>शासनमान्य औद्योगिक संस्थेचे डेटा एन्ट्री ऑपरेटरचे उत्तीर्ण प्रमाणपत्र<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>टंकलेखनाचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र. (महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले.)<br>३० श.प्र.मि. मराठी<br>४० श.प्र.मि.इंग्रजी<br>न.प. सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. | लागू नाही. | १००% | लागू नाही. |

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ४ | G-६ | वाहनचालक | वाहनचालक | क<br>३०५०-४५९० | किमान माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>जड वाहनचालक परवाना आणि जड वाहन चालविण्याचा किमान **दोन वर्षाचा अनुभव** असणे आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही. |
| ५ | G-८ | शिपाई | शिपाई | ड<br>२५५०-३२०० | नववी उत्तीर्ण (दहावीपर्यंत)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>दहावी उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य | लागू नाही | १००% | लागू नाही. |

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा / अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ६ | ACT -३ (II) | लेखाधिकारी श्रेणी-क (द्वितीय) | सहायक लेखापाल/ सहायक लेखापरीक्षक | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाचा वाणिज्य शाखेचा पदवीधर आणि ICWA किंवा Chartered Accountant असणे आवश्यक.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले) आवश्यक.<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प. सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. | शासनमान्य विद्यापीठाचा वाणिज्य शाखेचा असणे आवश्यक.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>ICWA/CA उमेदवारासाठी किमान तीन वर्षे व B.Com. उमेदवारासाठी किमान सात वर्षे अनुभव आवश्यक<br>या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र आवश्यक. | ५०% | ५०% |

टीप : ACT-३ (II) या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करुन ACT-३(I) उपलेखापाल (५०००-८०००)म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | [illegible] | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळ सेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळ सेवा/ अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ७ | SAN-४ | स्वच्छता निरीक्षक | स्वच्छता निरीक्षक | क ४०००-६००० | शासनमान्य विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर. स्वच्छता निरिक्षकाचा किंवा शासनमान्य संस्थेचे सार्वजनिक आरोग्य पदविका (डी.पी.एच.) **असणे आवश्यक.**<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>न.प. सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |
| टीप : SAN-४ या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करुन SAN-३ वरीष्ठ स्वच्छता निरीक्षक (४५००-७०००)म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील. | | | | | | | | |
| ८ | SAN-५ | मुकादम | मुकादम | ड २६१०-४००० | लागू नाही. | सफाई कामगार संवर्गातून. सातवी पास. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. निम्न पदावरील किमान **बारा वर्षाचा अनुभव** असणे **आवश्यक.** | लागू नाही | १००% |
| ९ | SAN-६ | सफाई कामगार | सफाई कामगार | ड २५५०-३२०० | सातवी उत्तीर्ण मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता सरळ सेवेसाठी | [illegible] | [illegible] | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १० | PW-३ (II) | नगरपरिषद अभियंता श्रेणी-क (द्वितीय) | कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाची स्थापत्य विषयातील पदवी (बी.ई.सिव्हील) / पदविका (डी.ई.सिव्हील) असणे आवश्यक. पदवीधारकास प्राधान्य.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प. सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |

टीप : PW-३ (II) या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करुन PW-३(I) बांधकाम पर्यवेक्षक (५०००-८०००)म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | COM-३ (II) | नगरपरिषद अभियंता (संगणक) श्रेणी-क (द्वितीय) | JUNIOR PROGRAMMER/ FACILITY MANAGER | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाची संगणक विषयातील पदवी /DOEACC-Level-A समकक्ष पदविका असणे आवश्यक. पदवीधारकास प्राधान्य.<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प. सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक.. | लागू नाही | १००% | लागू नाही |

टीप : COM-३ (II) या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करुन COM-३(I) PROGRAMMER/ FACILITY MANAGER (५०००-८०००)म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पद्धत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा/ अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १२ | WW-५ | गाळणी चालक / प्रयोगशाळा सहाय्यक | गाळणी चालक / प्रयोगशाळा सहाय्यक | क ३२००-४९०० | शासनमान्य विद्यापीठाचा विज्ञान शाखेचा रसायनशास्त्र विषयातील पदवीधर **असणे आवश्यक.**<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले).<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र आवश्यक | लागू नाही. | १००% | लागू नाही. |
| १३ | TP-३ (II) | नगरपरिषद नगर रचनाकार श्रेणी-क (द्वितीय) | कनिष्ठ रचना सहायक | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाचा वास्तुशास्त्रातील पदवीधारक. बी.ई.आर्किटेक्ट किंवा एम.ई.(टाऊन अँड कंट्री प्लॅनिंग) किंवा पदविका (आर्किटेक्ट/टाऊन अँड कंट्री प्लॅनिंग) असणे आवश्यक. पदवीधारकास प्राधान्य.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आणि अशी परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |

टीप : TP-३ (II) या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करून TP-३(I) रचना सहायक (५०००-८०००)म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता<br>सरळ सेवेसाठी | पदोन्नतीसाठी | [illegible] | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १४ | WW-३ (II) | पाणीपुरवठा, जलनि:सारण व स्वच्छता अभियंता श्रेणी-क (द्वितीय) | कनिष्ठ पाणीपुरवठा, जलनि:सारण व स्वच्छता पर्यवेक्षक | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाचा यांत्रिकी/पर्यावरण अभियंता पदवी /पदविका असणे आवश्यक. (B.E./D.E.Mechanical/ Environmental) किंवा Environmental Science मधील पदव्युत्तर/पदविका अर्हता. पदवीधारकास प्राधान्य.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |

टीप : WW-३ (II) या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करून WW-३(I) पाणीपुरवठा, जलनि:सारण व स्वच्छता पर्यवेक्षक (५०००-८०००)म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | ELC-३ (II) | नगरपरिषद अभियंता (विद्युत) श्रेणी-क (द्वितीय) | कनिष्ठ विद्युत पर्यवेक्षक | क ४५००-७००० | शासनमान्य विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदवी (बी.ई.विद्युत)/ पदविका (डी.ई.विद्युत) असणे आवश्यक. पदवीधारकास प्राधान्य.<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प. सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी विभागीय परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र असणे आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |

टीप : ELC-३ (II) या पदावर १२ वर्षे सेवा झाल्यानंतर ही सेवा पदोन्नतीस पात्र असल्याची खातरजमा (स्थायी निदेश क्र.२०, दि.३१.१२.२००३ नुसार) करून ELC-३(I) विद्युत पर्यवेक्षक (५०००-८०००) म्हणून पदोन्नतीस अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नतीसाठी | सरळसेवा अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १६ | WW-६ | पंप ऑपरेटर/ जोडारी/वीजतंत्री | पंप ऑपरेटर/ जोडारी/ वीजतंत्री | क ३०५०-४५९० | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे २ वर्षांचे वीजतंत्री /जोडारी प्रमाणपत्र (प्रथम श्रेणीत उत्तीर्ण) (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले) **असणे आवश्यक.**<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र आवश्यक | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे २ वर्षांचे वीजतंत्री /जोडारी प्रमाणपत्र **असणे आवश्यक.**<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>व्हॉल्व्हमन या पदावरील किमान **सात वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.**<br>या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र आवश्यक. | उपलब्ध नसल्यास. | पदोन्नती साठी प्राधान्य |
| १७ | WW-७ | व्हॉलमन | व्हॉलमन | ड २५५०-३२०० | सातवी पास. मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. | लागू नाही | १००% | लागू नाही |

| अ. क्र. | सांकेतांक | संवर्ग | पदनाम | गट क्रमांक / वेतनश्रेणी | किमान शैक्षणिक अर्हता | | भरती पद्धत | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सरळसेवेसाठी | पदोन्नती साठी | सरळसेवा/ अंतर्गत भरती | पदोन्नती साठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १८ | ELC-५ | तारतंत्री | तारतंत्री | क ३०५०-४५९० | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे २ वर्षाचे वीजतंत्री/तारतंत्री (प्रथम श्रेणीत उत्तीर्ण) (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले) **असणे आवश्यक.**<br>MSCIT किंवा तत्सम प्रमाणपत्र. (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>न.प.सेवेत आल्यानंतर या संचालनालयाने विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक. अशी परीक्षा विहीत केली गेली नसल्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे LGS प्रमाणपत्र आवश्यक | लागू नाही. | १००% | लागू नाही. |
| १९ | | 〃 | वायरमन | क ३०५०-४५९० | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| २० | | 〃 | मुकादम/ मजूर/ रखवालदार | ड २५५० - ३२०० | लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय